मा.अति. महापालिका आयुक्त (वि)	अति.महा. आयुक्त (वि)कार्यालय
पुणे महानगरपालिका.	पुणे महानगरपालिका,पुणे-५.
ठराव क्र. :-१/२९५	जा.क्र.:-अतिमआ/उआ(साप्र)/आस्था/ २०७५
दिनांक :- ०७/०७/२०१७	दिनांक :- 7.7.17

-: आज्ञापत्र :-

विषय :- अभियांत्रिकी संवर्गातील ''उप अभियंता (विद्युत)'' वर्ग-२ या रिक्त पदावर बढतीने हंगामी नेमणूका करणेबाबत.

संदर्भ :- १) आज्ञापत्र जा.क्र. मआ/उआ(साप्र)/आस्था/१९५३,दि.०४/०७/२०१७.
२) मा. महा.आयुक्त ठ.क्र १/७६८, दिनांक १५/१२/२०१६.
३) मा. अति.महा आयुक्त (वि) ठ.क्र.१/२९८ दि. ०७/०७/२०१७

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील ''शाखा अभियंता (विद्युत) वर्ग-२'' या पदावरील खालील सेवकाची '' उप अभियंता (विद्युत) वर्ग-२ '' (वे.श्रे.रु. ९३०० ते ३४८००+ ग्रेड पे ५४०० + मान्य भत्ते) या पदावर संदर्भ क्र.२ व ३ चे मान्यतेनुसार बढतीने हंगामी नेमणूक करण्यात येत आहेत.

अ.क्र.	सेवकाचे नांव	सध्याचे खाते	बढतीचे खाते	शेरा
१	श्री. डोके सुभाष नामदेव (खुला)	विद्युत विभाग	परिमंडळ क्र. २	श्री.माळी योगेश यांचे बढतीने रिक्त जागी.

सदर बढतीची नेमणूक मनपा सेवाविनियम १० (अ) नुसार परिविक्षाधीन पध्दतीने करण्यात येत आहे. या नियमानुसार पुढील शिफारस करण्याची जबाबदारी संबंधित खातेप्रमुख यांचेवर राहील. परिविक्षाधीन कालावधीमध्ये अधिकाऱ्याचे बढतीचे पदावरील काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास त्या अधिकाऱ्यास कोणतीही पूर्वसूचना न देता बढतीपूर्व पदावर नेमण्यात येईल.

उप अभियंता (विद्युत) या पदाच्या रोस्टरची मा. विभाग प्रमुख, मागासवर्ग कक्ष, पुणे महानगरपालिका यांचेकडून प्राथमिक तपासणी करण्यात आली असून मा. सहाय्यक आयुक्त, (मागासवर्ग कक्ष), पुणे विभाग, पुणे यांचे अंतिम मान्यतेच्या अधिन राहून शाखा अभियंता (विद्युत) वर्ग-२ या निम्न संवर्गातून उप अभियंता (विद्युत) वर्ग-२ या पदावर पदोन्नती देण्यात येत आहे.

उपरोक्त सेवक यांना या आज्ञापत्रकानुसार बढती खात्यात त्वरीत हजर होण्यासाठी सोडण्यात येत आहे. यासाठी स्वतंत्र कार्यमुक्ती आदेश देण्यात येणार नाही. सेवक बढतीच्या जागेवर रुजू झालेबाबतचे निवेदन संबंधीत खातेप्रमुख यांनी आस्थापना विभागाकडे सादर करावे.

वरील सेवकास मनपा सेवाविनियमानुसार वेतन व भत्ते आदा करणेत यावेत.

तरी, संबंधित मा.खातेप्रमुख यांनी वरीलबाबत पुढील जरुर ती तजविज करावी.

(प्रेरणा देशभ्रतार)
अतिरिक्त महापालिका आयुक्त(वि)
पुणे महानगरपालिका

प्रत - संबंधित मा.खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना --

(संतोष भोर)
उप आयुक्त(सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका